# महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

## विधान भवन, मुंबई

क्रमांक २३७६४ /ह-१ शाखा.

दिनांक : 29 NOV 2022 नोव्हेंबर, २०२२.

## :: परिपत्रक ::

संदर्भ :- (१) या सचिवालयाचे परिपत्रक क्र.३०६३०/ह-१ शाखा, दिनांक २२ नोव्हेंबर, २०१७.
(२) या सचिवालयाचे परिपत्रक क्र.२५९०५/ह-१ शाखा, दिनांक १९ ऑक्टोबर, २०१८.
(३) या सचिवालयाचे परिपत्रक क्र.५६७/ह-१ शाखा, दिनांक ७ जानेवारी, २०१९.
(४) या सचिवालयाचे परिपत्रक क्र.६७५/ह-१ शाखा, दिनांक १६ डिसेंबर, २०१९.
(५) या सचिवालयाचे परिपत्रक क्र.१७३९२/ह-१ शाखा, दिनांक १२ डिसेंबर, २०२०.
(६) या सचिवालयाचे परिपत्रक क्र.१७८९५/ह-१ शाखा, दिनांक २४ नोव्हेंबर, २०२१.

निदेशानुसार सर्व सन्माननीय सदस्यांना कळविण्यात येते की, सन २०१६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ अन्वये महाराष्ट्र विधानमंडळाच्या सदस्यांचे वेतन व भत्ते याबाबत अधिनियमात सुधारणा झालेली आहे. अधिनियमातील नवीन सुधारणेनुसार मा.सदस्यांना वेतन व भत्त्यामधून मिळणाऱ्या रकमेपैकी मूळ वेतन व महागाई भत्त्याची रक्कम आयकर अधिनियम १९६१ मधील तरतूदीनुसार आयकरास पात्र ठरत आहे. तसेच त्यांना अनुज्ञेय असलेल्या महागाई भत्त्याच्या दरामध्ये वेळोवेळी वाढ झालेली आहे. त्यानुसार सन्मा.सदस्यांना सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षात खालीलप्रमाणे वेतन/भत्ते अनुज्ञेय आहेत :-

| अ.क्र. | वेतन व भत्ते तपशील | वेतन रुपयात | आकयरास पात्र/अपात्र बाबी |
|---|---|---|---|
| (१) | वेतन | रुपये १,८२,२००/- | पात्र |
| (२) | महागाई भत्ता ३४% | रुपये ६१,९४८/- | पात्र |
| (३) | दूरध्वनी | रुपये ८,०००/- | अपात्र |
| (४) | टपाल | रुपये १०,०००/- | अपात्र |
| (५) | संगणक चालक | रुपये १०,०००/- | अपात्र |
| | एकूण वेतन .. | **रुपये २,७२,१४८/-** | |

तुर्तास, मा.सदस्य यांच्या सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षातील माहे मार्च, २०२२ ते फेब्रुवारी, २०२३ पर्यंतच्या मूळ वेतन व महागाई भत्त्याची रक्कम गृहित धरुन त्या रक्कमेवर लागू होणाऱ्या आयकराची वजाती नियमानुसार माहे एप्रिल, २०२२ पासून त्यांच्या वेतन व भत्त्यामधून करण्याची कार्यवाही सुरू आहे. या कार्यवाहीसाठी आयकर अधिनियम, १९६१ मधील तरतूदींच्या अधीन राहून सर्व सन्मा.सदस्यांनी पुढील बाबींची पुर्तता करण्याची आवश्यकता आहे :-

२/-

**(१) या परिपत्रकासोबत जोडण्यात आलेल्या Income Tax Declaration Form चे कृपया अवलोकन करावे. अधिनियमातील तरतूदीनुसार जुनी करप्रणाली (Old Regime) अथवा नवीन कर प्रणाली (New Regime) याबाबतची निवड करावी व सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षात आयकरातून सूट प्राप्त होणेकरिता या अधिनियमातील कलम ८०-सी, ८०-सीसीसी, ८०-सीसीडी, ८०-डी, ८०-जी अंतर्गत समाविष्ट बाबीमध्ये रक्कम गुंतविली असल्यास, अशा गुंतवणुकीचा तपशील Income Tax Declaration Form भरुन सन्मा.सदस्यांनी स्व:साक्षांकित (self-attested) केलेली गुंतवणुकीची कागदपत्रे तसेच, इतर आवश्यक असलेल्या कागदपत्रांसह शुक्रवार, दिनांक ३० डिसेंबर, २०२२ रोजीपर्यंत विधान भवन, मुंबई/नागपूर येथील येथील 'ह-१' कक्षात सादर करावीत. सदरहू माहिती प्राप्त झाल्याशिवाय आयकराची अंतिम रक्कम निश्चित करणे या सचिवालयास शक्य होणार नाही. त्यामुळे सन्मा.सदस्यांकडून गुंतवणूकीचा तपशील विहित मुदतीत प्राप्त झाला नाही तर अशी कुठलीही गुंतवणूक सन्मा.सदस्यांनी केलेली नाही असे गृहीत धरुन आयकराची आकारणी करण्यात येईल. त्याचप्रमाणे ज्या मा.सदस्यांना आयकर सवलतीकरीता कोणतीही माहिती द्यावयाची नाही, त्यांनी सदर फॉर्म 'निरंक' म्हणून सादर करावा.**

(२) अधिनियमातील तरतूदी, खाजगीरित्या केलेल्या गुंतवणुका तसेच, ज्येष्ठ नागरिक सवलत इत्यादी बाबींवर आयकराच्या रकमेची वजाती अवलंबून असल्यामुळे प्रकरणनिहाय आयकर वजातीची रक्कम भिन्न राहील. आयकरासंदर्भातील कार्यवाहीमध्ये केवळ वेतन व आमदार निवास भत्ता या साठीचा फॉर्म १६-अ या सचिवालयाकडून सन्मा.सदस्यांना देण्यात येणार आहे. ज्या सन्मा.सदस्यांचे या व्यतिरिक्त उत्पन्नाचे अन्य स्त्रोत आहेत, त्यांनी Form 16-A या सचिवालयाकडून प्राप्त करुन घेऊन अतिरिक्त आयकर आकारणी संदर्भातील पुढील आवश्यक ती कार्यवाही स्वतंत्ररित्या त्यांचे स्तरावर करणे आवश्यक आहे.

(३) मा.सदस्यांचे स्वीय सहायक यांच्या पारिश्रमिकामध्ये दिनांक २४ ऑगस्ट, २०१६ पासून वाढ करण्यांत आली असून ते दरमहा रुपये २५,०००/- इतके आहे. संसदीय कार्य विभागाचा शासन निर्णय क्रमांक : सुविधा-२०२२/प्र.क्र.२०/दोन, दिनांक १५ नोव्हेंबर, २०२२ रोजीच्या शासन निर्णयानुसार सदर पारिश्रमिकात रुपये ३०,०००/- प्रतिमहा याप्रमाणे दिनांक १ एप्रिल, २०२२ पासून वाढ करण्यांत आली आहे. या शासन निर्णयानुसार पुढील कार्यवाही होऊन प्रत्यक्ष रक्कम प्रदान करण्यांस काही कालावधी लागेल. रुपये ३०,०००/- प्रतिमहा प्रमाणे एकूण वार्षिक रक्कम रुपये ३,६०,०००/- इतकी होत असून आयकर नियमानुसार रुपये ५,००,०००/- (वार्षिक) पर्यन्तच्या उत्पन्नावर आयकर सूट (रिबेट) अनुज्ञेय आहे. त्यामुळे त्यांनी उपरोक्त कागदपत्रांची पुर्तता करण्याची आवश्यकता नाही.

या व्यतिरिक्त मा.सदस्यांच्या वाहनचालकांना सुध्दा दिनांक ०१ एप्रिल, २०२२ रोजीपासून रुपये २०,०००/- इतके पारिश्रमिक अनुज्ञेय करण्यांत आले असून ते देखील तुर्त सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षासाठी आयकरास पात्र ठरत नाहीत. त्यामुळे त्यांनी देखील कागदपत्रांची पूर्तता करण्याची आवश्यकता नाही.

यानुषंगाने येथे नमूद करण्यात येते की, या सचिवालयाकडून मा.पीठासीन अधिकारी, मा.विरोधी पक्षनेते, मा.सदस्य यांचे वेतन तसेच त्यांच्या स्वीय सहायकाचे पारिश्रमिक ECS/NEFT द्वारे अदा करण्याची कार्यवाही करताना मा.सदस्यांच्या वेतनासोबतच त्यांच्या स्वीय सहायकाचे व वाहनचालकाचे पारिश्रमिक देखिल प्रत्येक महिन्याच्या ठराविक तारखेला बँकेत थेट जमा होत असल्याने स्वीय सहायक व वाहनचालकाच्या सेवा समाप्ती भूतलक्षी प्रभावाने करता येणार नाहीत; त्याचप्रमाणे सेवा समाप्तीबाबतचे पत्र महिन्याच्या पंधरा तारखेच्या आत देणे आवश्यक राहील. परंतु, असे निदर्शनास आले आहे की, मा.सदस्यांकडून स्वीय सहायक व वाहनचालकाच्या नेमणूका व सेवा समाप्तीबाबत वारंवार बदल होत असतो तसेच काही मा.सदस्य त्यांच्या स्वीय सहायक व वाहनचालकांची नियुक्ती अथवा सेवा समाप्ती भूतलक्षी प्रभावाने करीत असतात.

स्वीय सहायक व वाहन चालकाच्या आयकराची निश्चिती ही त्यांना मिळणाऱ्या परिश्रमिकाच्या वार्षिक उत्पन्नावर करावयाची असल्याने आर्थिक वर्षाच्या मध्यंतरातच स्वीय सहायकाची सेवा समाप्ती अथवा नियुक्ती केल्यास अडचणीचे ठरु शकते. सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षाकरिता स्वीय सहायकांच्या परिश्रमिकाच्या वर्षिक उत्पन्नावर आयकरात सूट (रिबट) असली तरी आगमी वर्षात त्यात बदल होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अत: यासंदर्भात देखिल सन्मा.सदस्यांनी नोंद घेऊन सहकार्य करावे.

तसेच, मा.सदस्यांनी या सचिवालयास स्वीय सहायकाचे व वाहनचालकाचे नाव आणि त्यांचा सेवा नियुक्तीचा दिनांक कळविल्याप्रमाणे त्या स्वीय सहायकास वेतन अदा करण्याची कार्यवाही या सचिवालयाकडून करणे क्रमप्राप्त ठरते. परंतु अशा स्वीय सहायकाची व वाहनचालकांची सेवा सदस्यांकडून भूतलक्षी प्रभावाने समाप्त केल्यास संबंधितास अदा केलेल्या वेतनाची वसुली करता येत नाही आणि याच कालावधीसाठी नव्याने नियुक्त करण्यात येणाऱ्या स्वीय सहायकास/वाहनचालकास वेतनही अदा करता येत नाही. एकंदरीतच स्वीय सहायकाची/वाहनचालकाची भूतलक्षी प्रभावाने सेवा नियुक्ती आणि सेवा समाप्ती या बाबी वेतनाच्या आणि आयकर वजातीच्या कार्यवाहीसाठी अडचणीच्या ठरतात.

**वरील वस्तुस्थिती विचारात घेता यापूर्वी सूचित केल्यानुसार स्वीय सहायकाची व वाहनचालकाची नेमणूक व सेवा समाप्ती भूतलक्षी प्रभावाने करण्यात येऊ नये.**

उपरोक्त नमूद सर्व बाबीसंदर्भात काही अडचणी असल्यास, या सचिवालयाच्या "ह-१" कक्षाशी संपर्क साधावा.

अत: उपरोक्तप्रमाणे कार्यवाही करुन सहकार्य करावे ही विनंती.

**( मेघना तळेकर )**
उप सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

सोबत: Declaration Form.

प्रति :-

**(१) महाराष्ट्र विधीमंडळाचे सर्व सन्माननीय सदस्य.**
**(२) सन्मा.सदस्यांचे स्वीय सहायक.**

याची प्रत :-

(१) मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव.
(२) मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.
(३) मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.
(४) मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.
(५) मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.
(६) विधीमंडळातील सर्व पक्ष कार्यालये.

(New)

| Income Tax Declaration Form for the Financial Year 2022-23 | | | |
|---|---|---|---|
| **Name:** | | **PAN No:** | |
| **Designation:** | | **Gender:** | |
| **Department:** | | **DOB :** | |
| **DOJ:** | | **Contact No.** | |
| **Email** | | | |
| **I-----------------------hereby declare that My TDS should be calculated taking into consideration all deduction available under Income Tax Act, 1961 as declared below / my tax to be calculated as per new tax slab as applicable u/s 115BAC of Income Tax Act, 1981.** | | | |
| **S. No.** | **DESCRIPTION** | **Rs.** | **Proof Document Required** |
| A | **Particulars of Income from sources other than salary (optional)** | | |
| 1 | Dividends | | Certificate |
| 2 | Interest (Please mention saving bank account interest seperately) | | Certificate |
| 3 | Other Incomes (specify) | | Appropriate Certificate |
| | **Total Earnings** | | |
| B | **Income from House Property** | | |
| | Annual Value of House Property (As Per Income Tax Act) | | Documentary Proof |
| | **Less:** | | |
| | (I) Standard Deduction as per Section 24(1) | | |
| | (II) Interest on Housing Loan - as per Section 24(2) (for Tax Exemption - Property acquired /constructed before 01-04-1999 - Maximum Rs.30,000 elgible & Self Occupied/Let out/Deemed to be let out Property acquired /constructed after 01-04-1999 - Maximum Rs.200,000 eligble) | | |
| | a. Amount of Interest for the F.Y. 2022-23 | | Bank Certificate |
| | b. Amount of Interest for Pre-Construction Period (as per Income Tax Rule) | | Certificate |

Date:



Name with Signature of Hon. Member

| | | | |
|---|---|---|---|
| | **Total Income from House Property** | **0** | |
| C | **HRA: RENT PAID PER MONTH** ( Please mention the starting and ending month) | **Rent (p.m.)** | |
| | Period: April 2022 and December 2022 | | Original Rent Receipts every month (with Revenue Stamp above Rs. 4999/-) or Rent Agreement. Receipt should contain Name, Address & PAN of Landlord if Rent Per Month is equal to or exceeds 8000/-. |
| | Period: January 2023 and March 2023 | | |
| | **Total Rent Paid (per annum)** | | |
| D | **INVESTMENTS U/S 80C, 80CCC & 80CCD (1) capped at Rs 1.5 Lakh** | | |
| 1 | Life Insurance Premium(LIC) | | No proof of document required |
| 2 | Provident Fund (PF) | | No proof of document required |
| 3 | Public Provident Fund(PPF) | | Receipts / Statement |
| 4 | Voluntary Provident Fund(VPF) | | Certificate |
| 5 | Housing Loan Repayment Principal (payable in F.Y. 2022-23) | | As per Provisional Bank Certificate |
| 6 | National Saving Scheme / Certificate | | Certificate |
| 7 | Interest accrued on NSC(Re-invested) | | Certificate / Acknowledgement |
| 8 | Unit Linked Insurance Policy(ULIP) | | Certificate / Acknowledgement |
| 9 | Equity Linked Savings Scheme(ELSS)-Mutual Fund | | Certificate / Acknowledgement |
| 10 | Mutual Fund (eligible fund under this section) | | Certificate / Acknowledgement |
| 11 | Children Education Expenses / Tuition Fees (Max.2 children) | | Certificate / Copy of fees paid. |
| 12 | Stamp Duty, Registration charges incurred for Buying House(1st Year Only) | | Proof of document required |
| 13 | Infrastructure Bonds | | Proof of document required |
| 14 | Bank Fixed Deposit For 5 Years & Above | | Proof of document required |
| 15 | Post Office Term Deposit For 5 Years & Above | | Proof of document required |
| 16 | Senior Citizen Savings Scheme | | Proof of document required |
| 17 | Sukanya Samriddhi Account Scheme | | Proof of document required |
| 18 | Senior Citizen Savings Scheme | | Proof of document required |
| 19 | Sukanya Samriddhi Account Scheme | | Proof of document required |
| 20 | Others, (Please specify if any) | | Certificate / Receipts |
| 21 | Employees Contribution under NPS 80CCD(1B)<br>(Max Rs.50000.00 In Addition to u/s 80C, 80CCC & 80CCD (1)) | | Proof of document required |

Date:



Name with Signature of Hon. Member

| | | | |
|---|---|---|---|
| 22 | Contribution To Certain Pension Funds(80CCC) | | Upto Rs.150000 |
| 23 | Contribution To Pension Scheme of Central Government(80CCD(1)) | | Upto Rs.150000 |
| 24 | Contribution To National Pension Scheme(80CCD(1B)) | | Upto Rs.50000 |
| | | | |
| **Total Investments U/S 80C, 80CCC & 80CCD (1) - limited to Rs 1,50,000/- + U/S 80 CCD (1B) maximum Rs.50,000/-** | | 0 | |
| E | **OTHER PERMITTED DEDUCTIONS** | | |
| 1 | 80D - Medical Insurance Premium (Rs. 30,000 for super senior citizen and Rs 25,000 for other than super senior citizen (Maximum deduction Rs.50,000). | | Receipt / Statement |
| 2 | 80DD - Deduction in respect of maintainance including medical treatment of a handicapped dependent who is a person with disability. (Rs.75000.00 for person with disability i.e. not less than 40 percent and Rs.125000.00 for person with severe disability i.e. 80 percent or above. | | Receipt / Statement/Proof of expenditure and necessary certificate from medical authority. |
| 3 | 80D-Preventive Health Check-up | | Max. Rs.5000/- (Within overall limit of Rs.25000/50000) |
| 4 | 80DDB - Expenditure on Medical Treatment for specified disease | | certificate / prescription from medical specialist + expense vouchers |
| 5 | 80E - Repayment of Interest against loan taken for higher Education. | | Bank Certificate and proof of payment,copy of sanction letter. |
| 6 | 80EE - Deduction (up to Rs. 50,000) in respect of interest on loan taken for residential house property, subject to certain conditions satisfied. | | Copy of sanction letter + Bank certificate+ Declaration regarding the only house on which such deduction is claimed. |
| 7 | 80G - Deduction in respect of donations to certain funds, charitable institutions etc. | | Receipts/ Proof of payment. |
| 8 | 80GG -Rent Paid but not in Receipt of HRA (Declaration in Form No. 10 BA required) | | Form No.10BA + Receipts |
| 9 | 80U-Permanent Physical Disability (Normal Rs. 75000/- and Severe Rs.1,25,000/-) | | Certificate from a medical authority. |
| 10 | Others - (Please specify if any) | | Related documents |
| **Total Deductions** | | 0 | |

Date:



Name with Signature of Hon. Member

| F | PREVIOUS EMPLOYMENT SALARY | Salary Paid | TDS (in Rs.) 0 |
|---|---|---|---|
| | If Yes, Form 16 from previous employer or Form 12 B attached | | Form 12 B from previous employer |

I, do hereby declare that Information as stated above is true and correct. I also authorize the Maharashtra Legislature Secretariat to recover Tax ( TDS) from my salary based on the declaration/documents submitted by me. I am personally liable to Income Tax proceedings for any misstatements in the declaration or proofs submitted herewith if they are inconsistent with the requirement of Income Tax Act, 1961.

I solemnly declare that to the best of my knowledge and belief the information given above is correct and complete.

| | | | |
|---|---|---|---|
| DATE : | | | |
| Place : | | Signature | |
| NOTE : | 1) KINDLY SUBMIT THIS FORM BEFORE 30th DECEMBER, 2022 WITH SUPPORTING DOCUMENTS. | | |
| | 2) PLEASE PROVIDE SELF ATTESTED SUPPORTING DOCUMENTS WITH THE DECLARATION FORM. | | |

Date:



Name with Signature of Hon. Member